वन्यप्राणी हल्ल्यात मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई मंजूर करण्याबाबत.
कै. शामु महागु शरणागत, वनरक्षक,
न्यू नागझीरा वन्यजीव अभयारण्य, उमरझरी, गोंदीया

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन आदेश क्र.एफएसटी-०८/२६/प्र.क्र.१६६/वने-४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- १३ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एफएसटी-११/२१/प्र.क्र.२४८/फ-४, दि.१२.१०.२०२२.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/प्र.क्र.७९ (२५-२६)/२६-२७/१२७, दि.१०.०८.२०२६

शासन आदेश :-

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय दि.१२.१०.२०२२ अन्वये वन वणवा, वन्यप्राणी हल्ला, वन तस्कर/शिकारी यांच्या हल्ल्यात तसेच वन्य प्राण्यांचा बचाव करताना मृत्यू पावलेल्या/कायमचे अपंगत्व आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा उक्त नमूद कारणामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसांना रू.२५.०० लक्ष एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देय आहे. संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार कै. शामु महागु शरणागत, वनरक्षक हे दि.०५.०८.२०२६ रोजी न्यू नागझीरा वन्यजीव अभयारण्यातील उमरझरी वनपरिक्षेत्रातील बांदरझरा कक्ष क्र.१४९ येथे गस्तीवर असताना त्यांच्यावर अचानक वन्यप्राणी अस्वलाने हल्ला केल्याने गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागेवरच मृत्यू झाला असल्याने, संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णय दि.१२.१०.२०२२ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून कै. शामु महागु शरणागत, वनरक्षक यांच्या वारसास रू.२५.०० लक्ष एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

२. या प्रयोजनार्थ होणारा खर्च, मागणी क्र.सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीव (योजनेत्तर) प्रशासन व संरक्षण (अनिवार्य) (२४०६ ००९६) (०१) वेतन या लेखाशीर्षातून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८१३१२४४२१४५४० असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAPKAL PRASHANT PRALHAD

Digitally signed by SAPKAL PRASHANT PRALHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=C2EC242CAEF55E035A22245B60A2752C90753E697F5E56596B3524D34280A891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9548CB33E24729A59B6A5C72EE905604BA53420C8EACFD34E9E8C2460B8AA409, cn=SAPKAL PRASHANT PRALHAD
Date: 2026.08.13 12:45:08 +05'30'

(प्रशांत सपकळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर .
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) महालेखापाल (लेखा परीक्षा/अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
५) उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदीया.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदीया.
७) निवड नस्ती (वने-४)